RNI NO. MAHMAR/2020/84035

कायदेविषयक मार्गदर्शन मोफत
संपर्क अ‍ॅड. सुशीला मो नं 8766507294

BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ

दि. 20 फेब्रुवारी 2026

1929- वर्धा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जाहीर सभा. संकलन प्रा. यशवंत दुपटे



शुक्रवार, २० फेब्रुवारी २०२६ | वर्ष : ६ | अंक : ५४ | दैनिक | किंमत : ₹५/-
Friday, 20 February 2026 | Year : 6 | Issue : 54 | Daily | Rate: Rs. 5/-

## पुन्हा असे घडले, तर राहुल गांधींना घरात घुसून गोळ्या घालू ...

25 खासदारांचाही उल्लेख

**नवी दिल्ली :** जय महाकाल, जय ओम बिर्ला, जय नरेंद्र मोदी. ज्या प्रकारे काँग्रेसच्या 25 खासदारांनी भारताच्या संसदेत घुसून लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना शिवीगाळ केली. त्यामुळे भाजपा आणि करणी सेनेच्या कार्यकर्त्यांमध्ये संताप आहे, पुन्हा अशी घटना घडली, राहुल गांधींना घरात घुसून गोळ्या घालू, अशी धमकी देणारा व्हिडीओ समोर आला आहे. काँग्रेसच्या नेत्यांकडून हा व्हिडीओ पोस्ट केला गेला आहे. 'आज पुन्हा आणखी एक गोडसे तयार केला जात आहे', असे म्हणत काँग्रेसने मोदी सरकारवर निशाणा साधला आहे. करणी सेनेच्या नेत्याकडून ही धमकी दिली गेली आहे. व्हिडीओमध्ये म्हटले आहे की, 'राहुल गांधी यांच्या सांगण्यावरून हे केले गेले आहे. राहुल गांधींनी नीट ऐकावे, पुन्हा असे घडले तर घरात घुसून गोळ्या घालून मारू आणि याला प्रशासन जबाबदार असेल.

÷25 खासदारांवर कारवाई झाली पाहिजे. मोदी सरकारचे मंत्री किरेन रिजिजू यांच्याकडून जे विधान केले गेले आहे, ते ऐकल्यापासून आम्ही खूप रागात आहोत. *'जर 24 तासांमध्ये त्या 25 खासदारांना अटक झाली नाही, तर प्रत्येकाला आम्ही गोळ्या घालू'*, अशी धमकी करणी सेनेच्या नेत्याकडून देण्यात आली आहे.

काँग्रेसच्या नेत्या सुप्रिया श्रीनेत यांनी हा व्हिडीओ पोस्ट करत लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना सवाल केला आहे. 'हा दहशतवादी स्वतःला करणी सेनेचा असल्याचे सांगत आहे. म्हणत आहे की, विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि 25 काँग्रेस खासदारांना गोळ्या घालू. ओम बिर्लाजी, हा तुमचा समर्थक आहे. तुम्हाला यावर काही आक्षेप नाही का? आतापर्यंत ना गुन्हा दाखल झालाय, ना अटक झाली आहे. सरकारच्या मौनावर प्रश्न आहे. माध्यमांनाही मौन धरले आहे का?', असेही श्रीनेत यांनी म्हटले आहे.

### 'आज पुन्हा आणखी एक गोडसे तयार केला जात आहे' : काँग्रेस

### पवन खेरा यांची भाजपा आणि आरएसएसवर टीका

संपूर्ण आरएसएस आणि भाजपा एक गोडसे फॅक्टरी आहे. तथाकथित करणी सेनेकडून राहुल गांधी आणि 25 खासदारांना दिलेली धमकी वेगळी घटना नाहीये. हा नियोजित आणि द्वेषपूर्ण कटाचा भाग आहे, असा गंभीर आरोप खेरा यांनी केला आहे. आधी किरेन रिजिजू जाहीरपणे खोटे बोलले आणि देशाची दिशाभूल केली की, काँग्रेसच्या खासदारांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांचा अपमान केला. उलट जो व्हिडीओ आहे, तो हा दावा पूर्णपणे खोटा ठरवतो. त्यात अशा पद्धतीचा अपमान केल्याचे दिसत नाही. त्यावेळी तर लोकसभा अध्यक्ष हसत असल्याचे दिसत आहे, असे उत्तर खेरा यांनी रिजिजू यांच्या आरोपांवर दिले आहे.



'भाजपा खासदारांकडून वेगवेगळ्या व्यासपीठांवर एकसारखीच विधाने केली जात आहे की, राहुल गांधी हे भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेसाठी सर्वात मोठा धोका आहेत. ही विरोधकांना बदनाम करण्याचे, राजकीय विरोधकांना विशेषतः राहुल गांधी यांच्याविरोधात हिंसेला वैध ठरवण्याची सुनियोजित मोहीम आहे, असा गंभीर आरोप खेरा यांनी केला आहे.

*'कट्टरपंथीय अशाच पद्धतीने काम करतात. ते एक खोटें बोलतात आणि ते वारंवार बोलत राहतात. त्याला राजकारणाचे आवरण लावतात आणि तोपर्यंत प्रसारित करत राहतात, जोपर्यंत त्यांचे समर्थक द्वेष आणि हिंसक होत नाही. तेव्हाही गोडसे बनवला गेला होता आणि आज पुन्हा आणखी एक गोडसे तयार केला जात आहे'*, अशी टीका खेरा यांनी यावर केली आहे.

## टीव्हीकेने केली विधानसभा निवडणुकीची तयारी तीव्र ...

तामिळनाडू विधानसभा निवडणुका

डीएमकेसोबत आघाडी करण्याचा निर्णय डीएमडीकेने घेतला आहे

27 फेब्रुवारी रोजी जाहीरनामा प्रसिद्ध होणार

**चेन्नई :** अभिनेता-राजकारणी विजय यांच्या पक्षाने, तमिलगा वेत्री कझगम (टीव्हीके) ने आगामी तमिळनाडू विधानसभा निवडणुकीसाठी तयारी तीव्र केली आहे. निवडणूक रिंगणात संघटित प्रवेशाचे संकेत देत, पक्षाने 27 फेब्रुवारी रोजी जाहीरनामा प्रसिद्ध करण्याची घोषणा केली आहे. पक्षाच्या सूत्रांनुसार, सर्व 234 तमिळनाडू विधानसभेच्या जागांसाठी उमेदवार ओळखण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. सुरुवातीच्या टप्प्यात, प्रत्येक जागेसाठी तीन संभाव्य उमेदवारांची निवड करण्यात आली आहे. यादीतील जवळपास 80 टक्के नावे जिल्हा सचिवांची आहेत. यावरून स्पष्ट होते की पक्ष तळागाळातील कार्यकर्त्यांना प्राधान्य देण्याचा मानस आहे आणि स्थानिक संघटना मजबूत करण्यावर भर देत आहे. शिवाय, यादीत राज्यस्तरीय अधिकारी आणि अनुभवी प्रशासकांची नावे देखील समाविष्ट आहेत. राजकीय विश्लेषकांचा असा विश्वास आहे की ही रणनीती संघटनात्मक निष्ठा आणि प्रशासकीय अनुभव यांच्यातील संतुलन प्रतिबिंबित करते.






**विल्लीवाक्कममध्ये, अलिकडेच पक्षात सामील झालेल्या माजी अण्णा द्रमुक आमदाराच्या मुलाचा उमेदवार म्हणून विचार केला जात आहे. कोलाथूरमध्ये एक प्रमुख उद्योगपती देखील निवडणूक लढवण्याची अपेक्षा आहे. तेनकासी जिल्ह्यात, अलंगुलम भागातील एका प्रमुख थिएटर मालकाचा मुलगा आणि वासुदेवनल्लूरचे माजी आमदार हे देखील संभाव्य उमेदवार आहेत.**

सर्वाधिक चर्चेत असलेली जागा म्हणजे अभिनेता विजय यांचा संभाव्य उमेदवार. अधिकृत घोषणा झालेली नसली तरी, विश्वसनीय सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार ते नागापट्टणम जिल्ह्यातील वेदारण्यम येथून निवडणूक लढवू शकतात. ही जागा सध्या माजी मंत्री ओएस मनियन यांच्याकडे आहे. द्रमुकचे उमेदवार गेल्या निवडणुकीत कमी फरकाने पराभूत झाले होते, ज्यामुळे ही जागा अत्यंत स्पर्धात्मक बनली आहे. पक्षाच्या अंतर्गत सर्वेक्षणांनुसार, येथून निवडणूक लढवल्यास विजय यांच्या विजयाची शक्यता मजबूत मानली जाते. जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यानंतर आणि उमेदवार निवड प्रक्रिया अंतिम टप्प्यात पोहोचल्याने, टीव्हीके त्यांच्या पहिल्या मोठ्या विधानसभा निवडणुकीत निर्णायक प्रभाव पाडण्यास सज्ज असल्याचे दिसून येत आहे.

### मच्छीमार आणि शेतकरी - निवडणुकीत महत्त्वाचे मतदार. वेदारण्यम मतदारसंघात मच्छीमार आणि शेतकऱ्यांची मोठी लोकसंख्या आहे, ज्यांना निवडणुकीत महत्त्वाचे मतदार मानले जाते.

### निवडणुकीआधी तामिळनाडूत राजकीय समीकरणे बदलले

DMDKची DMK तामिळनाडूमध्ये विधानसभा निवडणुकीचे वारे वाहू लागले असून, त्यामुळे डीएमडीकेने नवी मोट बांधली आहे. पक्षाने आगामी निवडणूक डीएमकेसोबत आघाडीत लढण्याची घोषणा केली आहे. 2024 मध्ये झालेली लोकसभेची निवडणूक डीएमडीकेने एआयडीएमके पक्षासोबत लढवली होती. 2024 डीएमडीकेने एआयडीएमकेच्या नेतृत्वाखाली आघाडीत लढताना पाच जागांवर उमेदवार दिले होते. एकही जागा जिंकता आली नाही. पक्षाचे अस्तित्व आणि विधानसभा निवडणुकीत कामगिरी सुधारण्याचे आव्हान आहे. त्याच पार्श्वभूमीवर पक्षाने आता प्रयत्न सुरु केल्याचे दिसत आहे. एप्रिल-मे महिन्यात तामिळनाडूमध्ये निवडणुका लागण्याचा अंदाज आहे. या निवडणुकीसाठी भाजपानेही कंबर कसली आहे. मात्र, त्याआधीच भाजपाचा मित्रपक्ष असलेल्या एआयडीएमकेला हा झटका मानला जात आहे. मागील 15 वर्षांपासून डीएमडीके एआयडीएमकेसोबत आहे. मध्य तामिळनाडूतील तिरुचिरापल्ली, पुदुक्कोट्टई, विरुधाचलम, ऋषिवंदियम, कल्लाकुरिची आणि उलुंदुरपेट या भागांमध्ये या पक्षाचे व्होट बँक आहे. 2011 मध्ये या पक्षाला 29 जागांसह 7.9 टक्के मते मिळाली होती. पण, 2016 आणि 2021 मध्ये पक्षाला एकही जागा मिळाली नाही.

## नागपुरात 50 वस्त्यांत होतोय दूषित पाणीपुरवठा

**नागपूर :** शहरातील नऊ झोनमधील सुमारे 50 वस्त्यांत दूषित पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारी आहेत. यामुळे जवळपास 4 लाख नागरिकांना आजारांचा धोका निर्माण झालेला आहे. हा गंभीर प्रकार असल्याने महापौर नीता ठाकरे यांनी याची दखल घेत सात दिवसांत ही समस्या सोडवण्यासाठी उपाययोजना करण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले. स्थायी समिती सभागृहात बुधवारी आयोजित जलप्रदाय विभागाच्या आढावा बैठकीत महापौरांनी महापालिका आणि ऑरेंज सिटी वॉटरच्या (ओसीडब्ल्यू) कामाचा आढावा घेतला. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरात पुरेशा दाबाने पाणीपुरवठा करावा, काही भागांत पाणी बिलांमध्ये अनेक पटींनी वाढ झाल्याच्या तक्रारींची दुरुस्ती करा, तसेच पाइपलाइनसाठी करण्यात आलेल्या खोदकामाची तत्काळ दुरुस्ती करण्याचे आदेश महापौरांनी दिले. बैठकीस सत्तापक्ष नेते नरेंद्र बोरकर, मनपा आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, अधीक्षक अभियंता डॉ. श्वेता बनर्जी, कार्यकारी अभियंता श्रीकांत वायकर आदी उपस्थित होते.

## महत्त्वाच्या बातम्या

### ब्रिटनच्या राजपुत्राला अटक

**लंडन :** ब्रिटिश राजघराण्याला हादरवून सोडणारी एक मोठी बातमी समोर आली आहे. किंग चार्ल्स यांचे धाकटे बंधू आणि ब्रिटनचे माजी प्रिन्स अँड्र्यू यांना अटक करण्यात आली आहे. 'एपस्टीन फाईल्स' मधील धक्कादायक खुलाशानंतर ही कारवाई करण्यात आल्याचे समजते. अँड्र्यू यांच्यावर सार्वजनिक पदाचा गैरवापर केल्याचा गंभीर आरोप ठेवण्यात आला आहे. महत्वाचे म्हणजे आज अँर्ड्यू यांचा 66 वा वाढदिवस होता. अमेरिकन लैंगिक गुन्हेगार जेफ्री एपस्टीन याच्याशी संबंधित गोपनीय दस्तऐवज सार्वजनिक झाल्यापासून प्रिन्स अँड्र्यू यांच्या अडचणीत वाढ झाली होती. या फाईल्समध्ये प्रिन्स अँड्र्यू यांच्यावर गंभीर आरोप करण्यात आले होते. लैंगिक शोषणाच्या आरोपांनंतर त्यांच्याकडून आधीच सर्व लष्करी पदव्या आणि राजघराण्यातील मानमरातब काढून घेण्यात आले होते. मात्र, आता त्यांना थेट अटक झाल्याने जगभरात खळबळ उडाली आहे.

### बनावट कॉल पकडण्यासाठी स्वदेशी एआय अ‍ॅप देशात अव्वल

**नवी दिल्ली :** देशभरात सायबर फसवणूक ही एक गंभीर आव्हान बनली आहे. दररोज लोकांना फसवे कॉल, बनावट कर्ज ऑफर आणि बँक तपशील मागणाऱ्या घोटाळ्यांचा सामना करावा लागतो. यावेळी, छत्तीसगडमधील एका भावा-बहिणीने विकसित केलेले 'कर्तव्य' हे अ‍ॅप आशा आणते. भारत मंडपम येथे झालेल्या देशातील सर्वात मोठ्या एआय हॅकेथॉनमध्ये, छत्तीसगडमधील या भाऊ-बहिणीच्या जोडीने सायबर फसवणूक करणाऱ्यांच्या युक्त्या आगाऊ शोधू शकणारे स्मार्ट अ‍ॅप तयार करून प्रथम क्रमांक पटकावला आहे. खरे तर, आयटी मंत्रालयाच्या एआय इम्पॅक्ट समिट अंतर्गत आयोजित या स्पर्धेत सुमारे 40 हजार सहभागींनी भाग घेतला होता. कठीण निवडीनंतर, केवळ 800 सहभागी अंतिम फेरीत पोहोचू शकले. अंतिम टप्प्यात, संघाने त्याचे समाधान आणखी सुधारले आणि अनेक भारतीय भाषांचा समावेश केला आणि टॉप-6 मध्ये स्थान मिळवले. उद्योग तज्ञ आणि सरकारी अधिकाऱ्यांसमोर ते सादर केल्यानंतर, या संघाने संपूर्ण देशात पहिले स्थान मिळवले

### 'कोका-कोला'च्या बॉटलिंग कंपनीवर आयकर विभागाची धाड

**नागपूर :** उपराजधानीच्या औद्योगिक क्षेत्रात मंगळवारी खळबळ उडाली. आयकर विभागाच्या दिल्लीतील पथकाने 'कोका-कोला' या जगप्रसिद्ध शीतपेय कंपनीची फ्रँचायझी असलेल्या 'सुपीरिअर ड्रिंक्स प्रायव्हेट लिमिटेड'च्या बुटीबोरी येथील प्लांटवर अचानक छापा टाकला. सकाळी सुरू झालेली ही तपासणी रात्री उशिरापर्यंत सुरू होती. या कारवाईची औद्योगिक वर्तुळात चर्चा होती. प्राप्त माहितीनुसार, या कारवाईची मुख्य सुत्रे दिल्लीशी जोडलेली आहेत. कोका-कोला कंपनीचे मुख्य कार्यालय दिल्लीत असल्याने आणि व्यवहारांमधील काही संशयास्पद बाबी दिल्लीच्या रडारवर असल्याने, तेथून विशेष पथक नागपुरात दाखल झाले. या मोहिमेत आयकर विभागाच्या नागपूर पथकानेही स्थानिक पातळीवर सहकार्य केले. 'सुपीरिअर ड्रिंक्स प्रायव्हेट लिमिटेड' ही कंपनी कोका-कोला ब्रँडच्या उत्पादनांची निर्मिती, पॅकेजिंग आणि वितरणाचे काम पाहते. बुटीबोरी औद्योगिक क्षेत्रातील त्यांच्या मुख्य प्लांटमध्ये मंगळवारी सकाळीच आयकर अधिकारी धडकले.

## अनेक राज्ये तोट्यात तरीही का वाटली जातेय मोफत खैरात...: सरन्यायाधीश

**नवी दिल्ली :** मोफत खैरात वाटपावर सुप्रीम कोर्टाने कडक शब्दात ताशेरे ओढले आहेत. मोफत योजनांमुळे अनेक राज्यातील सरकारवर कर्जाचा बोझा वाढला असून उत्पन्नही घटले आहे यावरून सुप्रीम कोर्टाने तीव्र नाराजी व्यक्त केली. कर्ज वाढत असतानाही मोफत योजना वाटल्या जात आहेत. याऐवजी रोजगार निर्मितीवर जास्त भर देणे आवश्यक आहे असं कोर्टाने म्हटले. सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्या खंडपीठाने ही महत्त्वाची टिप्पणी केली आहे. सरन्यायाधीशांच्या खंडपीठासमोर तामिळनाडू येथील वीज कंपनीशी निगडित एका प्रकरणावर सुनावणी सुरू होती. आम्ही टॅरिफ दर आधीच निश्चित केले होते असे वीज कंपनीचे म्हणणे होते तर आम्ही वीज मोफत केल्याचं सरकारने म्हटलं. यावरून सरन्यायाधीशांनी नाराजी व्यक्त केली. जर सरकार मोफत पैसे, वीज अथवा इतर सुविधा देत राहील तर त्याचा खर्च कोण उचलणार? अखेर मोफत खैरात वाटपाचा भार करदात्या लोकांवरच पडणार आहे. सरकारने मोफत गोष्टी वाटण्याऐवजी रोजगार निर्मितीकडे जास्त लक्ष द्यायला हवे असे सरन्यायाधीशांनी सांगितले.



## 42 आमदारांना हायकोर्टात राहावे लागणार हजर

**पटना :** बिहार विधानसभा अध्यक्ष प्रेम कुमार यांच्यासह 42 आमदारांना हायकोर्टात हजर राहावे लागणार आहे. प्रेम कुमार यांच्यासह 42 आमदारांना हायकोर्टाने नोटीस जारी केली आहे. ही नोटीस मिळणाऱ्यांमध्ये सत्ताधारी आणि विरोधकांमधील आमदारांचा समावेश आहे. यात ऊर्जा मंत्री विजेंद्र प्रसाद यादव यांचेही नाव आहे. पटना हायकोर्टाने ही नोटीस निवडणूक प्रतिज्ञापत्रात चुकीची माहिती दिल्याचा आरोप करणाऱ्या याचिकेवर सुनावणी करताना दिली आहे. कोर्टाने या सर्व 42 आमदारांना या आरोपांवर स्पष्टीकरण मागितले आहे. इतकेच नाही तर याचिकेचे गांभीर्य लक्षात घेऊन कोर्टाने सर्व 42 आमदारांना दिलेल्या मुदतीतच नोटिशीला उत्तर देण्याचे निर्देश दिले आहेत. या नोटिशीमुळे बिहारच्या राजकारणात खळबळ माजली आहे.



## गलगोटिया विद्यापीठाचा रोबोट डॉग वाद एआय समिटमध्ये प्रतिमा धोक्यात

**नवी दिल्ली :** नवी दिल्ली येथे सुरू असलेल्या India AI Impact Summit 2026 मध्ये Galgotias Universit4 जवळून सादर करण्यात आलेल्या रॉबोटिक डॉगी (रोबोडॉग) प्रदर्शनीने मोठा वाद उभा केला आहे आणि शैक्षणिक विश्वासार्हतेवर प्रश्न उपस्थित केले आहेत.

समिटमध्ये विद्यापीठाच्या स्टॉलवर "Orion" म्हणून सादर झालेला हा रोबोटिक डॉग प्रत्यक्षात चीनमधील युनिट्री Gow नावाच्या व्यावसायिक मॉडेलचा आहे असे सोशल मिडियावर ओळखले गेले.



या गोंधळामुळे विद्यापीठाला त्याचा स्टॉल रिकाम्या करण्याचा आदेश देण्यात आला, व कार्यक्रमातून काढले गेले अशी माहिती देखील प्रसिद्ध होत आहे. विद्यापीठाच्या एका प्राध्यापिकेच्या भाषणात हा रोबोट त्यांच्या Centre of E&cellence द्वारे विकसित केला गेला असल्याचे सांगितल्याने वाद अधिकच विस्तारला. नंतर विद्यापीठाने स्पष्ट केले की त्यांनी कधीही हा रोबोट स्वतः विकसित केला नाही आणि तो विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठी आणला होता, परंतु सुरुवातीला झालेली घोषणा चुकीची असल्यामुळे गैरसमज निर्माण झाला.

या विषयावर आयटी सचिव यांनीही स्पष्ट केले की समिटमध्ये प्रदर्शित वस्तूने त्यांची खरी ओळख स्पष्ट केली पाहिजे, आणि अन्यथा अशा प्रकारच्या गोंधळामुळे कार्यक्रमाची प्रतिमा धोक्यात येऊ शकते.

समाज माध्यमांवर या घटनेवर तीव्र प्रतिक्रिया नोंदवली जात असून, काहींनी शिक्षण संस्थेच्या निर्णयाची टीका केली आहे आणि देशाची तंत्रज्ञान विश्वसनीयता यावर प्रश्न उपस्थित केले आहेत.

गलगोटिया विद्यापीठ प्रशासनाने घटनाबद्दल खेद व्यक्त करत प्रदर्शित रोबोट त्यांच्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठी आणले होते असे स्पष्टीकरण दिले आहे आणि प्राध्यापिका नेहा सिंह यांची माहिती चुकीची असल्याचे सांगितले आहे. फिलहाल त्यांच्या विरुद्ध कोणतीही अधिकृत कारवाई करण्यात आलेली नाही, असेही विद्यापीठाचे नोंदले आहे. या रोबोट डॉग वादामुळे AI Impact Summit च्या मुख्य उद्देशांसह तंत्रज्ञानातील पारदर्शकता आणि शैक्षणिक विश्वासार्हतेवर पुनर्विचार करण्याची गरज दिसून येत आहे.

चलो संविधान चौक ! चलो संविधान चौक !



राष्ट्रीय एकता आंदोलन,
सकल ओबीसी महामोर्चा आणि
विविध SC - ST - OBC मायनॉरिटी संघटनाच्या वतीने
SC - ST - OBC च्या संविधानिक हक्कासाठी
भव्य धरणे आंदोलन
दिनांक : २०/०२/२०२६, दुपारी १२ ते ५ वाजता,
स्थळ : संविधान चौक, नागपूर

मागण्या
१) विद्यापीठ अनुदान आयोग नियमावली २०२६ लागू करा
२) येणाऱ्या जनगणनेत एससी, एसटी सह ओबीसी प्रवर्गाचा समावेश करावा.
३) EVM बंद करा व बॅलेट पेपरवर निवडणूका घ्या.
४) नविन ४ कामगार विरोधी कायदे तात्काळ रद्द करा.

विनीत
महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ, राष्ट्रीय संयुक्त मोर्चा, आशा व गट प्रवर्तक संघटना, ऑल इंडिया आदिवासी एम्प्लाईज फेडरेशन, संविधान परिवार, राष्ट्रीय चर्मकार महासंघ, राष्ट्रीय ओबीसी जनमोर्चा, अ.भा. तांडा सुधार समिती, संभाजी ब्रिगेड आणि विविध एससी, एसटी, ओबीसी, मॉयनारिटीज संघटना

संयोजक
राष्ट्रीय एकता आंदोलन आणि सकल ओबीसी महामोर्चा

# शीलवंताच्या दारी वळली पाऊले

**जुन्या काळातील निष्ठावान आंबेडकरी कार्यकर्ते, समता सैनिक दलाचे झुंजार सेनानी, डॉ. बाबासाहेबांचे अंगरक्षक नागपूरचे स्मृतिशेष प्रल्हाद मेंढे गुरुजी यांच्या निवासस्थानाला 25 वर्षानंतर पुनःश्च भेट देण्याची सुवर्णसंधी चालून आली. गुरुजींच्या सहवासातील आठवणीने हृदय गलबलून आले. डोळे पाणावले. आज 20 फेब्रुवारी गुरुजींचा 24वा स्मृतिदिन त्यानिमित्त त्यांच्या आठवणींना उजाळा...**




नागपूरच्या नागनगरीने अनेक धाडसी, तडफदार, निष्ठावान आंबेडकरी नररत्ने जन्माला घातली. ज्यांनी डॉ. बाबासाहेबांची चळवळ गतिमान करण्यासाठी वेळोवेळी मोलाचे योगदान दिले. डॉ. बाबासाहेबांनी प्रज्वलित केलेल्या क्रांतीच्या अग्नीकुंडात स्वतःच्या आयुष्याच्या समीधा टाकून ते यज्ञकुंड धगधगीत ठेवणाऱ्या अनेकांप्रमाणे एक सच्चे भीमसैनिक म्हणजे स्मृतिशेष प्रल्हाद मेंढे गुरुजी होत. डॉ. बाबासाहेब जेव्हा जेव्हा नागपूरला यायचे तेव्हा तेव्हा ते सावलीसारखी त्यांची सोबत करायचे, असे मी ऐकले होते. सूर्य एक असतो पण सूर्यमालेत अनेक ग्रहतारे सूर्याभोवती फिरत असतात. ते सूर्यापासूनच थोडासा प्रकाश घेऊन तो प्रकाश परावर्तीत करतात. त्यांची प्रकाशण्याची क्षमता काजव्यापेक्षाही क्षीण असते. पण त्यांची भक्ती आणि निष्ठा अपरंपार असते. मेंढे गुरुजीही त्याच उज्ज्वल परंपरेतील तेजस्वी तारा होते. अशा या महासूर्याभोवती फिरणाऱ्या बिंदू सदृश ताऱ्याला भेटण्याचा मला मोह अनावर झाला. 30 वर्षांपूर्वीचा तो काळ. कडक उन्हाळ्याचे दिवस होते. मी आपल्या वाहनाने प्रवास करीत गुरुजींच्या कर्नलबाग नागपूर येथील घरी पोहोचलो. पहिल्याच भेटीत त्यांच्या प्रेमळ, सुस्वभावी व्यक्तिमत्त्वाने मी भारावून गेलो. तो पुण्य दिवस 16 एप्रिल 1996चा होता. त्यानंतर अनेकदा भेटी झाल्या. भेटीचा हा सिलसिला तब्बल सहा वर्षे अव्याहतपणे सुरू होता. या सहा वर्षाच्या काळात गुरुजींनी मला जवळपास 20 धम्मपत्रे लिहिली, जी आजही माझ्या संग्रही आहेत. प्रत्येक भेटीत गुरुजी तासनतास बौद्ध धम्माच्या, डॉ. बाबासाहेबांच्या सहवासातील आणि चळवळीच्या रोचक आठवणी सांगायचे. तेव्हा माझा सारा क्षीण दूर व्हायचा. नवीन ऊर्जा मिळायची. चर्चेदरम्यान त्यांच्या सहचारिणी आदरणीय गीताबाई मेंढे न कंटाळता माझ्या खाण्यापिण्याची सोय करायच्या. गुरुजींनी मला एका आठवणीत सांगितले, डॉ. बाबासाहेबांच्या नावाने नागपुरात सर्वप्रथम वाचनालय आणि बुद्ध विहार कर्नलबाग येथे 1935 साली स्थापन झाले. 26 फेब्रुवारी 1936 ला माननीय एस. सी. एल. नासीर यांच्या अध्यक्षतेखाली आंबेडकर वाचनालयाला मुंबईतील शेठ महंमद जकेरिया यांनी देणगी स्वरूपात बरीच पुस्तके दिली होती. सोबतच 1948 साली भीम जयंतीचा अपूर्व सोहळा विठ्ठलराव साळवे यांच्या अध्यक्षतेखाली सतत एक महिना कर्नलबागेतच साजरा करण्यात आला. नागपुरातील नामांकित वकील ॲड. सी. बी. पारख प्रमुख पाहुणे म्हणून लाभले होते. याच कार्यक्रमात गुरुजींची बहीण जैना मेंढे हिने सुरेल आवाजात स्वागतगीत म्हटले होते. या उत्साहवर्धक जयंती सोहळ्याची दखल 'जनता' पत्रकाने घेतली होती. डॉ. बाबासाहेबांच्या सहवासात काही मोजके क्षण घालविण्याचे सुभाग्य गुरुजींना लाभले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जाहीर भाषण 25 डिसेंबर 1950 रोजी लष्करीबागच्या भव्य पटांगणात आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी डॉ. बाबासाहेबांचे अंगरक्षक म्हणून काम करण्याची सुवर्णसंधी त्यांना मिळाली. मेंढे गुरुजी समता सैनिक दलात होते. 14 ऑक्टोबर 1956च्या धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या सोहळ्यात डॉ. बाबासाहेबांच्या संरक्षणासाठी याच दलातील निवडक सैनिकांमधून खास अंगरक्षक पथक तयार करण्यात आले होते. त्याचे नेतृत्व गुरुजींकडे होते. या पथकात कर्नलबागेतील श्यामराव साळवे, विठ्ठलराव साळवे, एकनाथ गोडघाटेंसह अनेकांचा सहभाग होता. धम्मदीक्षेच्या वेळी डॉ. बाबासाहेबांची प्रकृती बरी नसल्याने त्यांनी मेंढे गुरुजींकडे आधारासाठी काठीची मागणी केली. तेव्हा त्यांनी डझनभर काठ्या आणून डॉ. बाबासाहेबांच्या पुढ्यात ठेवल्या. त्यातून आर्य अष्टांगिक मार्गाचे प्रतीक म्हणून डॉ. बाबासाहेबांनी आठ गाठी असलेली काठी आधारासाठी निवडली. डॉ. बाबासाहेब मुंबईला जाण्यासाठी 18 ऑक्टोबर 1956 रोजी नागपूरच्या सोनेगाव विमानतळावर पोहोचले तेव्हा मधुमेहाचा त्रास वाढला होता. इंजेक्शनची गरज होती. त्यावेळी गुरुजींनी सीताबर्डीवरील मॉडर्न ड्रग्ज एजन्सी येथून (3 रु. 12 पैसे) इंजेक्शन खरेदी करून आणले होते. डॉ. बाबासाहेबांना विमानात काठी नेता आली नाही. एअरोड्रोम ऑफिसर ती काठी घेऊन ऑफिसात नेत होते ही बाब गुरुजींच्या लक्षात आल्याबरोबर त्या ऑफिसरजवळून ती काठी त्यांनी हस्तगत केली आणि मौल्यवान अलंकाराप्रमाणे आयुष्यभर आपल्या राहत्या घरी सांभाळून ठेवली. शेवटच्या श्वासापर्यंत त्यांनी काठीसोबत स्वतःचे छायाचित्र काढले नाही आणि दुसऱ्यांनाही काढू दिले नाही. ते नेहमी म्हणायचे, 'डॉ. बाबासाहेबांच्या काठीसोबत छायाचित्र काढण्याची आपली लायकी नाही.' गुरुजींचा तोच आदर्श, तीच शिकवण त्यांची मुले आज आचरणात आणत आहेत. डॉ. बाबासाहेबांच्या काठीचे दर्शन देश-विदेशातील अनेक प्रसिद्ध नेत्यांनी, विचारवंतांनी घेतले आहे. त्यात डॉ. वलिसिन्हा (महाबोधी सोसायटीचे जनरल सेक्रेटरी), मुकुंदराव आंबेडकर, डॉ. ना. भा. खरे, डॉ. भवानीशंकर नियोगी, आचार्य अत्रे ('नवयुग'कार), आर. डी. भंडारे, यशवंतराव आंबेडकर, भदन्त डॉ. आनंद कौसल्यायन, दादासाहेब गायकवाड, शांताबाई दाणी, बॅ. राजाभाऊ खोब्रागडे, डॉ. एलिनार झेलियट (डॉ. बाबासाहेबांवर पीएचडी करणारी प्रथम अमेरिकन विदुषी), बी. पी. मौर्य, एल. आर. बाली ('भीमपत्रिका'कार), आर. एस. गवई, सुगंधाताई शेंडे, न्या. आर. आर. भोळे (डॉ. बाबासाहेबांचे सहकारी), अशोक आंबेडकर, वा. को. गाणार, न्या. भाऊसाहेब वाहणे आणि वसंत मून (आंबेडकरी साहित्याचे संग्रहकर्ता) यांचा समावेश आहे. धम्मचक्र प्रवर्तन दिन, आंबेडकर जयंती, बुद्ध जयंती आणि 6 डिसेंबरला काठी कर्नलबागेतील बुद्धविहारात अनुयायांच्या दर्शनासाठी ठेवली जाते. 1960-70च्या दशकात एका कवीराजाने डॉ. बाबासाहेबांच्या याच काठीवर हृदयस्पर्शी गीत रचले होते. त्याकाळी हे गीत कमालीचे लोकप्रिय झाले होते. त्या गीताचे सुरुवातीचे बोल असे होते ''नागपुरातून विमान सुटले, दीक्षा आम्हा देवूनी बाबा गेले काठी ठेवूनी, हीच ती काठी...'' सुमारे 25 वर्षानंतर माझी पाऊले नुकतीच मेंढे गुरुजींच्या घराकडे वळली. घरात प्रवेश करताच त्यांच्या आठवणीने मन गहिवरून आले. वरच्या माळ्यावर गुरुजींची स्वतःची लायब्ररी होती, ती आजही आहे. जिन्यावरून ते हळुवारपणे येजा करायचे. जिन्याकडे बघून क्षणभर वाटले की, 'गुरुजींचे दर्शन होईल! ते माझ्याशी प्रसन्न मुद्रेत चर्चा करतील!' स्वतःला धीर दिला. भक्तिभावाने त्यांच्या प्रतिमेला आणि काठीला त्रिवार वंदन केले. वृद्धत्वाकडे झुकलेल्या त्यांच्या सहचारिणीचे दर्शन होताच हायसे वाटले. आंबेडकरी चळवळीत 'दादा' म्हणून नावारूपास आलेल्या श्रद्धेय प्रल्हाद मेंढे गुरुजींचे 20 फेब्रुवारी 2002 रोजी परिनिर्वाण झाले. आज कर्नलबाग बदलले. मात्र ग्रेट मेंढे परिवार (सविता प्रल्हाद मेंढे, सुधा, सुनीता, राजेंद्र, पौर्णिमा आणि विजयेंद्र) आजही वडिलांचा विचार घेऊन चालत आहे हे पाहून अभिमान वाटला. त्यांच्यात सर्वांप्रती आजही प्रेम, आपुलकी आणि सहानुभूती कायम आहे. मेंढे परिवाराचा जड अंतःकरणाने निरोप घेऊन पुढच्या प्रवासाला निघालो... 24व्या स्मृतीदिनानिमित्ताने गुरुजींच्या पावन स्मृतीला विनम्र अभिवादन आणि अश्रूपूर्ण मानाचा मुजरा. ■■



मिलिंद मानकर
मो. 8177866397

# जिवनशैली

## अनंतायन



ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677

जेव्हा आयुष्याचा प्रवास सुखा, समाधानाने सुरू असतो तेव्हा सर्वजण सोबत असतात पण जरा का विपरीत परिस्थिती निर्माण झाली की, हळूहळू काहीजण काढता पाय घेतात पण खरे जिवलग लोक मात्र परिस्थिती कशीही असो साथ सोडत नाहीत. कुणाच्याही वाट्याला जन्मभर चांगले दिवस येत नाहीत. प्रत्येकाच्या नशीबी काही ना काहीतरी दुःख नक्कीच येतात पण काहीजण ते सर्व मुकाट्याने सहन करतात तर काहीजण हसत हसत आपले दुःख लपवतात. यालाच जिवन असे म्हणतात. आपल्या आयुष्यात भलेही कमी लोक असु द्या पण ते साथ सोडणारे नसावे. कारण आपले आयुष्य म्हणजे गर्दी जमवणारा तमाशाचा फड नाही तर ती एक जिवनशैली आहे. कुणाचेही आयुष्य हे चुकांनी भरलेले असते पण एक गोष्ट लक्षात ठेवावी की, चुका कितीही झाल्या तरी चालतील पण उद्देश मात्र वाईट नसावा. आयुष्यात विचार आणि व्यवहाराला खुप महत्त्व आहे. एक व्यवहार विचारांना बदलून टाकु शकतो तसेच तसेच एक विचार व्यवहार बदलू शकतो. आयुष्यात काही लोक असेही असतात जे एखाद्याला पायदळी तुडवण्या आधी डोक्यावर घेऊन नाचतात. धोका देणे हा त्यांच्यासाठी एक गमतीचा खेळ असतो. हे ते महाभाग असतात जे 'वो मिलते हैं, और सवाल बेमिसाल पुछते है, जो ही खुद ही जख्म देते है, वो ही हाल बार बार पुछते है 'मित्रांनो ! मुळात धोका ही फार सुंदर गोष्ट असावी नाहीतर तो कुणी खाल्लाच नसता. धोका खाल्ल्यावर माणसाला प्रश्न पडतो की 'मुस्कुराहट दिखी मगर, ऑखों की नमी ना दिखी, दिल दुखानेवालों को कभी किसीकी कमी ना दिखी 'या व अशा कितीतरी गोष्टींचा सामना करत करतच आयुष्य पुढे रेटायचे असते पण एक खुणगाठ मनाशी पक्की बांधून ठेवायची की, 'खुद ही से कर उम्मीद, खुद ही को कर तलाश, यूँ ही नहीं बनता कोई पत्थर से भगवान. ■■

# मी पाहिलेल्या शोकसभा!

जगणे आणि जग सोडून जाणे ही निरंतर घडणारी घटना आहे, जगणे ही ज्याच्या त्याच्या शील मार्गाचा विषय आहे. त्याचे जीवनाला तो किती महत्त्वपूर्ण बनवतोय की साधारण. हे सर्व त्याच व्यक्तीच्या हातात आहे. व्यक्ती कितीही कार्यक्षम, लोकप्रिय व काम करणारी असेल... सदैव आर्थिक दुर्बल घटकासाठी किंवा समाजासाठी काम करणारी असेल, म्हणजेच ती व्यक्ती आपले आयुष्य जगत असताना इतरांच्या आयुष्याचा विचार करीत मार्गक्रमण करीत असते. तेच आयुष्य फक्त स्वतःच पुरते जगत असणारी व्यक्ती सुद्धा असते.

पण जी व्यक्ती खरोखर काम करते त्या व्यक्तीच्या कामाचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष अनुभव घेतलेले अनेक लोक समाजात असतात. अर्थातच ती व्यक्ती समाजातील लोकांसाठीच काम करीत असते. पण मी अनेक अंतिम संस्कारांमध्ये गेले असता शोकसभा हा अंतिम संस्काराचा एक भाग असतो. त्यामध्ये अनेक लोक बोलणारे असतात की ती व्यक्ती, तिचे कार्य, तिचे व्यक्तिमत्व, अशा प्रकारचे होते. अलीकडेच माझ्या कुटुंबातील व्यक्तीच्या शोकसभेमध्ये गेले असता जेव्हा त्यांचे कार्य तिथे त्यांच्या उपस्थितांपैकी बोलून दाखवले त्यावेळेस असे लक्षात आले की त्यांचे कार्य आमच्यापर्यंत कधी आलेच नाही. मग या सर्व गोष्टी त्या व्यक्तीच्या उपस्थितीत त्याला एकदा सांगून आणि त्याचे समाजाकडून आभार व्यक्त करण्याची पण प्रथा राहायला पाहिजे. पण तसे नाही ती व्यक्ती हयात असेपर्यंत तिची किंमत कुणालाच नसते आणि एकदा आपल्यात उपस्थित नसल्यामुळे आणि कधीच उपस्थित होऊ न शकल्यामुळे या शोकसभेमध्ये बोलणाऱ्यांची पण गर्दी वाढायला लागली. आता ती व्यक्ती आपल्यात नाही, त्यामुळे तिला कधीच कळणार नाही की समाज त्या व्यक्तीचे कार्य अशाप्रकारे आठवणीत ठेवते आहे. एकच वाटते एकदा भेटून समाजातील व्यक्तींनी समोरासमोर आभार व्यक्त करण्याची परंपरा सुरू केली पाहिजे. ■■



संगीता चव्हाण
मो. 8329863644

# प्रेम – जगण्याची ऊर्जा देणारी अखंड प्रेरणा

**फेब्रुवारी महिना आला की वातावरणात एक वेगळीच कोमलता दरवळू लागते. वाऱ्यालाही जणू मृदु स्पर्श लाभतो. शब्दांनाही सुगंध येते. जगण्याला नवे अर्थ सापडतात. हा महिना जगामध्ये 'प्रेमाचा महिना' म्हणून ओळखला जातो. पण प्रेम फक्त हा उत्सव किंवा सण नसून सृष्टीचा शाश्वत नियम आहे. 'प्रेम आहे म्हणून जग आहे' आणि 'जग आहे म्हणून प्रेम आहे'. प्रेमाशिवाय हे संपूर्ण विश्व अपूर्ण आहे. कारण सृष्टीचा प्रत्येक कण परस्परांवरील प्रेम, आकर्षण, ओढ आणि जिव्हाळ्यावर टिकून आहे. प्रेम म्हणजे केवळ दोन हृदयातील भावनांची देवाण-घेवाण नव्हे. तर ती 'माणसाला माणूस बनवण्याची शक्ती आहे'. कारण जेव्हा दोन हृदय एकत्र येतात तसे विचारही एकत्र आले पाहिजे.**

त्या विचारात माणुसकीची ज्योत असली पाहिजे. कारण समाज बदलायचा असेल तर सुरुवात आधी हृदयापासून होते. कारण क्रांती नेहमी रस्त्यावर नाही तर आधी मनात होते. 'मी' पासून तर 'आपण'पर्यंतचा प्रवासच खऱ्या मानवतेचा आरंभ आहे. प्रेम माणसाला सांगते, 'तू एकटा नाहीस' ही जाणीव त्यांना संकटाशी उभी राहण्याची ताकद देते. जगणे ही एक सुंदर देणगी आहे आणि प्रत्येक श्वासात एक शक्यता दडलेली आहे. प्रत्येक हृदयात एक स्पंदन आहे आणि त्या स्पंदनाला चालना देणारी अदृश्य शक्ती म्हणजे प्रेम. प्रेम हे जीवनातील प्रवासातील ऊर्जा स्त्रोत आहे. ते थकलेल्या पावलांना बळ देते. निराश मनाला आशेची दिशा देते आणि माणसाला माणूस म्हणून जगायला शिकवते. जगण्याच्या अथांग प्रवासात माणूस कधी थकतो, कधी हरवतो तर कधी स्वतःलाच विसरतो. पण या सर्व अवस्थांमध्ये जर कोणती शक्ती त्याला पुन्हा उभे करीत असेल तर ती म्हणजे प्रेम आहे. कारण प्रेम हे फक्त भावना नसून सृष्टीचा श्वास आहे. जगण्याची ऊर्जा देणारी अखंड प्रेरणा आहे. विश्वाच्या इतिहासाकडे पाहिले तर प्रत्येकच युगात महापुरुष हे प्रेमाच्या दीपस्तंभासारखे उभे राहिलेले दिसतात. त्यांच्या हृदयातील अथांग सागरातील विविध रूपाने त्यांनी जगाला प्रेम दिले. प्रभू येशू ख्रिस्ताने क्षमेमधून मानवतेला करूणेचा मार्ग दाखवला. पैगंबर मोहम्मद यांनी 'रहमतुल्लीन आलमिन' दया आणि बंधूभावाचा संदेश देत समाजाला न्यायाचे प्रेम शिकवले. गुरुनानक देवांनी 'एक ओंकार' तत्वातून समता आणि सेवाभावाचे प्रेम जागवले. भगवान बुद्धांनी करुणा, मैत्री आणि अहिंसेच्या मार्गाने द्वेषावर प्रेमाचा विजय मिळवण्याची शिकवण दिली. संत कबीरांनी जाती-धर्मांच्या भिंतीवर प्रेमाचे प्रहार करून 'ढाई आखर प्रेम का, पढे सो पंडित होई' तत्व जगाला सांगितले. संत सेवालाल महाराजांनी समाजात स्वाभिमान आणि नैतिकतेचे प्रेम जागवले. क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांनी शिक्षणातून शोषितासाठी प्रेमाची क्रांती उभी केली. रयतेचा राजा शिवाजी महाराजांनी प्रेम आणि कर्तव्याला जोडले आणि न्याय, शिस्त आणि समाजसेवा या तत्त्वावरती प्रेम जगले. संत तुकाराम महाराजांनी भक्ती आणि माणुसकीला जोडून प्रेमाचे सामाजिक रूप दाखवले. राजर्षी शाहू महाराजांनी समतेला राज्यकारभारात स्थान देऊन प्रेमाला सामाजिक न्यायाचे रूप दिले. संत रविदासांनी महाराजांनी 'मन चंगा तो कठोती मे गंगा' या पवित्र विचाराने आणि समतेच्या संदेशाने जगाला प्रेम दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यातून प्रेमाला संविधानाच्या पायावर कोरले. थोडक्यात सांगायचे झाल्यास या सर्व महापुरुषाच्या कार्यात प्रेमाची प्रचंड ऊर्जा वाहताना दिसते. यांचे मार्ग जरी वेगळे असले तरी सर्वांच्या कार्यात एकसमान सूत्र दिसते. ते म्हणजे मानवतेवरील अपार प्रेम. त्यांचे हे प्रेम केवळ शब्दात नव्हते. तर कृतीत होते ते समाज घडणीचे, समतेचे आणि बंधुतेचे प्रेम होते. त्यांनी जगाला दाखवून दिले की प्रेम हे परिवर्तनाची सर्वात मोठी ताकद आहे. माणूस म्हणून जन्म घेणे जरी सोपे असले तरी 'माणूस होणे ही एक साधना आहे' आणि या साधनेचा केंद्रबिंदू म्हणजे प्रेम आहे. जेव्हा मनात करुणा जागी होते तेव्हा दुसऱ्याच्या वेदनेशी आपले नात जुळले जाते. विचारात न्याय येते. विषमता सहन होत नाही आणि वर्तनात माणूस उतरते. तेव्हा समाज नव्याने घडते आणि अंतर्मुखातून सुरू झालेला हा प्रवास एक दिवस नक्कीच क्रांती घडवते आणि प्रेमाची खरी क्रांती म्हणजे माणूसपणाला केंद्रस्थानी ठेवणे आहे. माणूस म्हणून प्रत्येकाला सन्मान मिळायला पाहिजे. ही भावना जेव्हा प्रेमातून जन्म घेते तेव्हा समाज बदलू लागते आणि प्रेम मग केवळ दोन व्यक्तींच्या नात्यापुरते मर्यादित राहत नाही तर ते एक सामाजिक मूल्य बनते. कारण प्रेम जर खर असेल तर व्यक्ति बदलते. व्यक्ति बदलली की कुटुंब बदलते आणि कुटुंब बदलले की समाजही बदलतो. म्हणून व्हॅलेंटाईन डे ला गुलाब देण्याऐवजी विचार द्या. भेटवस्तू देण्याऐवजी समानतेची हमी द्या आणि शब्द नका देऊ तर कृतीतून माणुसकी दाखवा. कारण प्रेमाचा खरा रंग माणूसपण आहे. आज जग वेगाने पुढे जात आहे. तंत्रज्ञान वाढले सुविधाही वाढल्या पण माणसातील माणूस हरवला जात आहे. मनामनातील अंतरही वाढले आहे. जात, धर्म, पंत, भाषा यांच्या भिंतीही वाढल्या आहेत. ते फक्त प्रेमच दूर करू शकते. कारण प्रेम कधी भेदाभेद करत नाही. तर प्रेमाचा सेतू बांधते, समता शिकवते. म्हणूनच फेब्रुवारीचा महिना आपल्याला आठवण करून देते की प्रेमाला एका दिवसापूर्वी मर्यादित ठेवू नका. प्रेम आपल्या विचारात रुजवा, कृतीत जगा आणि समाजात पेरा. कारण प्रेम असेल तरच शांती असेल, समता असेल आणि मानवता जिवंत राहील. चला या व्हॅलेंटाईन डे च्या निमित्ताने आपणही एक आपल्या अंतःकरणातील प्रेमाचा सूर्य उगवून देऊया. कारण जेव्हा मन प्रेमाने उजळले, तेव्हा जग खऱ्या अर्थाने सुंदर होईल... ■■



मनिषा आनंदराव कांबळे
मो. 9763515510

# वाटणारे उंच संपत्तीचे शिखरे आणि खोल गेलेली भुकेची खाई...

**जगाच्या इतिहासात संपत्तीचे असे विरोधाभासी भेसूर चित्र कदाचित कधीच रेखाटले गेले नव्हते. दिसते नव्हते ते आज प्रकर्षाने दिसत असून एकीकडे मूठभर माणसे एका वर्षात इतकी संपत्ती कमवतात जी संपूर्ण देशांच्या वार्षिक उत्पन्नापेक्षा जास्त असते, तर दुसरीकडे जगातील प्रत्येक चौथा माणूस झोपताना अर्धे पोटी झोपत असते. Oxfam International ने दावोस येथे झालेल्या World Economic Forum दरम्यान 2025 मध्ये प्रसिद्ध केलेल्या 'Resisting the Rule of the Rich: Protecting Freedom from Billionaire Power' या अहवालाने जागतिक विषमतेचे एक अत्यंत धक्कादायक चित्र जगासमोर मांडले आहे.**

या अहवालातील आकडेवारी मन सुन्न करणारी आहे. 2025 मध्ये जगातील अब्जाधीशांची एकूण संपत्ती तब्बल 18.3 लाख कोटी डॉलरवर पोहोचली, जी मागील वर्षाच्या तुलनेत 16 टक्क्यांहून अधिक आहे. म्हणजे केवळ एका वर्षात या अतिसंपन्न वर्गाच्या संपत्तीत अडीच लाख कोटी डॉलरची भर पडली. ही रक्कम जगातील सर्वात दुर्बल 383 कोटी लोकांच्या एकूण संपत्तीपेक्षाही अधिक आहे. जागतिक इतिहासात पहिल्यांदाच अब्जाधीशांची संख्या 3,000 च्या पुढे गेली असून त्यांची एकूण संपत्ती सर्वोच्च पातळीवर आहे. 2020 पासून आतापर्यंत या वर्गाची संपत्ती 81 टक्क्यांनी वाढली आहे, तर जगातील अर्ध्या लोकसंख्येची आर्थिक स्थिती जवळपास ढासळली आहे. या आकडेवारीचे भयावहपण समजण्यासाठी एक तुलना पुरेशी आहे. या एका वर्षातील संपत्तीवाढ जगातील टोकाच्या दारिद्र्याचा 26 वेळा पूर्ण अंत करण्यासाठी पुरेशी आहे. म्हणजे जर या संपत्तीचा योग्य वापर केला असता, तर जगातील संपूर्ण भीषण गरिबी सव्वीस वेळा नाहीशी करता आली असती. मात्र हे घडणे अशक्य वाटते, कारण अब्जाधीशांची संख्या आणि त्यांची संपत्ती वाढतच चालली आहे. दारिद्र्य निर्मूलनाचा वेग मात्र उलट दिशेने जात आहे. जागतिक अब्जाधीश इलॉन मस्क अर्धा ट्रिलियन डॉलरचा महाकाय किल्ला या संपत्तीच्या महाकाय पिरॅमिडच्या सर्वोच्च शिखरावर विराजमान आहेत. जगाच्या इतिहासात प्रथमच एखाद्या व्यक्तीची संपत्ती अर्धा ट्रिलियन डॉलर म्हणजे 5,02,000 कोटी डॉलर एवढी झाली आहे. हे आकडे केवळ गणिताचा खेळ वाटतात, पण त्यांचे वास्तविक स्वरूप लक्षात घेतल्यास डोळे दिपतात. जगातील एकूण 117 देशांचे सकल घरेलू उत्पन्न GDP इलॉन मस्क यांच्या एकट्याच्या संपत्तीपेक्षा कमी आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी नोव्हेंबर 2024 मध्ये अमेरिकेची सत्ता स्वीकारल्यानंतर अब्जाधीशांची संपत्ती मागील पाच वर्षांच्या तुलनेत तीनपट वेगाने वाढली. ट्रम्प प्रशासनाच्या धोरणांनी या वाढीस मोठ्या प्रमाणावर हातभार लावला. अतिसंपन्नांवरील कर कमी करण्यात आले, मोठ्या कंपन्यांवरील कर लावण्याचे आंतरराष्ट्रीय प्रयत्न कमकुवत झाले, एकाधिकार रोखण्याचे कायदे शिथिल करण्यात आले आणि कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील गुंतवणुकीस प्रोत्साहन देण्यात आले. या सर्वांचा परिणाम केवळ अमेरिकेतील नव्हे, तर जगभरातील अब्जाधीशांवर झाला. अमेरिकेच्या बाहेरही जगातील इतर देशांतील अब्जाधीशांची संपत्ती दहाच्या दराने वाढली आहे व राजकीय सत्ता आणि अब्जाधीशांचे साटेलोटे हे केवळ आर्थिक विषमता हा या संकटाचा एकमेव पैलू नाही. खरा धोका आहे तो राजकीय सत्तेवरील अब्जाधीशांच्या वाढत्या प्रभावाचा.



आक्सफर्मच्या अहवालानुसार, अब्जाधीशांना राजकीय पदावर पोहोचण्याची शक्यता सामान्य नागरिकांच्या तुलनेत 4,000 पट अधिक आहे. हा आकडा लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वालाच आव्हान देत असून लोकशाहीत प्रत्येक नागरिकाचा आवाज समान असायला हवा, मात्र प्रत्यक्षात जो अधिक श्रीमंत, त्याचा आवाज अधिक मोठा हे दिसून येत आहे. 66 देशांमध्ये करण्यात आलेल्या World Values Survey मध्ये सुमारे निम्म्या लोकांनी सांगितले की त्यांच्या देशात श्रीमंत लोक निवडणुका विकत घेतात हे वास्तव आहे. निवडणूक निधी, माध्यमांवर नियंत्रण आणि धोरणनिर्मितीवर प्रभाव या तीन मार्गांनी अब्जाधीश लोकशाहीला आतून पोखरत आहेत. या मधून 'आर्थिक दारिद्र्य भूक निर्माण करते आणि राजकीय दारिद्र्य राग.' हा राग आज जगभरात सरकारविरोधी उठावांच्या रूपात उफाळून येत आहे. 2024 मध्ये सलग एकोणिसाव्या वर्षी जगभरात नागरिकांच्या स्वातंत्र्यात घट नोंदवण्यात आली. एक चतुर्थांश देशांनी अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर निर्बंध घातले. 68 देशांत सरकारविरोधात 142 हून अधिक मोठी आंदोलने झाली. अनेकदा हिंसाचाराने दडपण्याचा प्रयत्न करण्यात आला. असमानतेने ग्रस्त देशांमध्ये लोकशाही कमकूवत होण्याची शक्यता सातपट अधिक असते, हे संशोधनाने सिद्ध झाले आहे. म्हणजे विषमता केवळ आर्थिक समस्या नाही, ती लोकशाहीची हत्यारा आहे हे समजून घेणे आवश्यक आहे. कारण आता माध्यमांवर अब्जाधीशांचे नियंत्रण असून लोकशाहीला सर्वात मोठा धोका माहितीच्या युगात जो माध्यमांवर नियंत्रण ठेवतो, तो सत्य घडवतो आणि आज जगातील निम्म्याहून अधिक मोठ्या माध्यम कंपन्या अब्जाधीशांच्या ताब्यात आहेत. सर्व प्रमुख सामाजिक माध्यमे व्यासपीठेही त्यांच्याच मालकीची आहेत. जेफ बोझेस यांनी The Washington Post, Elon Musk Øæ´Ùè Twitter/X, Patrick Soon-Shiong यांनी Los Angeles Times आणि अब्जाधीशांच्या एका गटाने The Economist मध्ये मोठी हिस्सेदारी घेतली आहे. फ्रान्समध्ये Vincent Bollor यांनी CNews या वाहिनीला 'फ्रान्सचे Fox News' बनवले आहे. कॅलिफोर्निया विद्यापीठाच्या एका अभ्यासानुसार, Elon Musk यांनी - (पूर्वीचे Twitter) खरेदी केल्यानंतर त्यावर द्वेषपूर्ण भाषणात सुमारे 50 टक्के वाढ झाली आहे. हे माध्यम आधी एक मुक्त चर्चामंच होते; आता ते एका माणसाच्या विचारसरणीचे प्रचारयंत्र झाल्याचा आरोप होत आहे. केन्यामध्ये अधिकाऱ्यांनी या व्यासपीठाचा वापर टीकाकारांवर लक्ष ठेवण्यासाठी आणि त्यांचे दमन करण्यासाठी केल्याचा दावा Oxfam च्या अहवालात करण्यात आला आहे. तसेच आर्थिक विषमतेच्या संकटाशी थेट निगडित असलेले आणखी संकट म्हणजे भूमी शरण. Food and Agriculture Organization च्या The State of Food and Agriculture 2025' या अहवालात हे समोर आले आहे की सुमारे 1.7 अब्ज लोक अशा प्रदेशांत राहतात जिथे मानवी कारणांमुळे भूमी क्षरणामुळे पिकांचे उत्पादन घटत आहे. जमिनीची जीवन आणि उत्पादनासाठी आवश्यक पर्यावरणीय क्षमता दीर्घकाळासाठी कमी होणे म्हणजे भूमी क्षरण. अति चराई, अस्थिर शेती आणि चुकीच्या सिंचन पद्धती ही भूमी क्षरणाची प्रमुख कारणे आहेत. या क्षरणाचे परिणाम भयावह आहेत. जगभरात सरासरी 10 टक्के पिकउत्पादन घटले आहे आणि 4.7 कोटी पाच वर्षांखालील मुले कुपोषणामुळे खुंटलेल्या वाढीने ग्रस्त आहेत. जगात सध्या जेवढ्या शेतीभूमी आहेत, त्यातील केवळ 10 टक्के जमीन पुनर्जीवित केली, तर दरवर्षी 15.4 कोटी अतिरिक्त लोकांना अन्न उपलब्ध होऊ शकते, असे अहवालात नमूद करण्यात आले आहे. पीक फेरपालट, आच्छादन पिके आणि शाश्वत भूमी व्यवस्थापन पद्धतींचा अवलंब हे उपाय उपलब्ध आहेत, मात्र राजकीय इच्छाशक्ती नसल्यास ते अंमलात येणे कठीण आहे. भूमी क्षरण ही केवळ शेतकऱ्यांची समस्या नाही ती प्रत्येक जेवणाच्या ताटाशी निगडित आहे. भूमी क्षरण झाल्यास पिकांचे उत्पादन कमी होते, अन्नाचे भाव वाढतात, शेतकरी कर्जाच्या विळख्यात सापडतो आणि शेवटी शहरांकडे स्थलांतर वाढते. या साखळीतील प्रत्येक दुवा दारिद्र्य आणि भूक वाढवतो. दुर्दैवाने, जे सर्वात कमी जमीन खराब करतात म्हणजे अल्पभूधारक गरीब शेतकरी त्यांनाच याचा सर्वाधिक भुर्दंड सहन करावा लागतो, कारण औद्योगिक शेती आणि मोठ्या कंपन्यांच्या कारवायांमुळे होणाऱ्या जमीन नाशाची किंमत समाजाच्या सर्वात कमजोर घटकांना चुकवावी लागते. आपण बघितल्यास असे दिसते की भूक आणि हवामान बदल भविष्याची भयंकर जोडी 2025 मध्ये जगभरात 29.5 कोटीहून अधिक लोकांनी भूक आणि दुष्काळाचा सामना केला. हे आकडे केवळ आर्थिक अपयशाचे नव्हे, तर सामूहिक नैतिक अपयशाचे प्रतीक आहेत. युद्ध, विस्थापन, आर्थिक संकट आणि हवामान बदल ही अन्न असुरक्षेची प्रमुख कारणे आहेत. यातील सर्वात भयावह कारण हवामान बदल आहे, कारण ते भविष्यातही वाढत राहणार आहे. Scientific Reports या प्रतिष्ठित जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या एका संशोधन अभ्यासानुसार, जर हरितगृह वायूंचे उत्सर्जन असेच सुरू राहिले, तर 2100 पर्यंत तब्बल 1.16 अब्ज लोक किमान एकदा गंभीर अन्नसंकटाचा सामना करतील. त्यात 60 कोटीहून अधिक मुले आणि 20 कोटीहून अधिक नवजात बालके असतील. हा आकडा वाचताना छाती दडपते. पण एक आशेचा किरणही आहे जर आपण टिकाऊ विकास आणि उत्सर्जन कपातीची धोरणे वेळेत राबवली, तर 2100 पर्यंत 78 कोटी लोकांना अन्नसंकटापासून वाचवता येऊ शकते. प्रामुख्याने आफ्रिकेत तीव्र दारिद्र्य पुन्हा वाढत आहे. मागील वर्षी अनेक सरकारांनी मदत अर्थसंकल्पात कपात केली, ज्यामुळे जागतिक आरोग्य, शिक्षण आणि पोषण कार्यक्रमांना मोठा फटका बसला. या कपातींमुळे 2030 पर्यंत 1.4 कोटी अतिरिक्त मृत्यूंचा धोका निर्माण झाल्याचा इशारा तज्ज्ञांनी दिला आहे. हे मृत्यू रोखता येऊ शकतात पण त्यासाठी राजकीय इच्छाशक्ती हवी, जी आज अब्जाधीशांच्या प्रभावाखाली गेली आहे आणि खाद्य सुरक्षा केवळ धान्य उत्पादनाचा प्रश्न नाही. खाद्य सुरक्षा केवळ अधिक धान्य उत्पादनाने सुनिश्चित होत नाही हे एक महत्त्वाचे सत्य अनेकांना माहीत नाही. जगात आज पुरेसे अन्न उत्पादन होते, पण ते सर्वांपर्यंत पोहोचत नाही. अन्नसाखळी कुठे तुटते? वितरण व्यवस्थेत, साठवणुकीत, परवडण्याजोगेपणात आणि राजकीय इच्छाशक्तीत. मजबूत स्थानिक कृषी व्यवस्था, जलसंवर्धन, विविध पिकांची शेती आणि समुदाय सहभाग या चार स्तंभांवर खरी खाद्य सुरक्षा उभी राहते. जगभरातील कृषी संशोधनाने दाखवून दिले आहे की लहान शेतकऱ्यांना सहाय्य केले, तर ते मोठ्या औद्योगिक शेतापेक्षा जास्त उत्पादन देतात आणि जमिनीचा कमी नाश करतात. मात्र जागतिक कृषी धोरणे मोठ्या कृषी कंपन्यांना अनुकूल आहेत, ज्या जमीन, पाणी आणि बियाण्यांवर एकाधिकार मिळवत आहेत. अन्नाची असुरक्षितता आणि संपत्तीची विषमता या दोन्ही समस्यांचे मूळ एकाच ठिकाणी आहे. सत्ता आणि संसाधनांचे केंद्रीकरण. भारताच्या संदर्भात विचार करता, देशातील किसानांच्या आत्महत्यांची संख्या, शेतीमालाला मिळणारा कमी भाव, पाण्याची टंचाई आणि हवामान बदलामुळे होणारे अनियमित पाऊस या सर्व गोष्टी जागतिक अन्नसंकटाशी थेट जोडलेल्या आहेत. भारतात सुमारे 55-60 कोटी लोक शेतीवर अवलंबून असले तरी कृषी क्षेत्राचे GDP मधील योगदान केवळ 15-17 टक्के आहे. ही विषमता देशांतर्गत अन्नसुरक्षेसाठी मोठा धोका आहे. या सर्व समस्यांचे निराकरण अशक्य नाही. Oxfam आणि इतर आंतरराष्ट्रीय संस्थांनी ठोस उपाय सुचवले आहेत. सर्वप्रथम, असमानता कमी करण्यासाठी ठोस आणि कालबद्ध राष्ट्रीय योजना तयार करणे आवश्यक आहे. अतिसंपन्नांवर प्रभावी कर लादणे, माध्यम स्वातंत्र्य आणि नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण करणे हे त्यातील महत्त्वाचे घटक आहेत. Brazil सारख्या देशाने टक्के 20 च्या अध्यक्षपदाचा उपयोग करत जागतिक अब्जाधीश कर प्रस्तावित केला होता. एक महत्त्वाचे पाऊल, जरी तो प्रस्ताव अद्याप मर्यादित स्वरूपातच पुढे गेला आहे. EU च्या Digital Services Act ने माध्यम कंपन्यांवर जबाबदारी लादण्याचा प्रयत्न केला आहे. अशा उपाययोजना जागतिक पातळीवर राबवण्याची गरज आहे. जमीन पुनर्जीवनाच्या क्षेत्रात, केवळ विद्यमान शेतीभूमीच्या 10 टक्के भूमी पुनर्जीवित केल्यास दरवर्षी 15.4 कोटी अतिरिक्त लोकांना अन्न उपलब्ध होऊ शकते. हा उपाय तांत्रिकदृष्ट्या शक्य आहे, फक्त इच्छाशक्ती हवी आहे आणि हवामान बदलाचा सामना करण्यासाठी उत्सर्जन कपात, नवीकरणीय ऊर्जेकडे जलद संक्रमण आणि हवामान न्यायाचे तत्त्व महत्त्वाचे आहे. हवामान न्याय म्हणजे ज्या देशांनी सर्वाधिक प्रदूषण केले, त्यांनी कमी विकसित देशांना हवामान बदलाच्या परिणामांचा सामना करण्यासाठी आर्थिक मदत करणे. हे नैतिक आणि व्यावहारिक दोन्ही दृष्टींनी आवश्यक आहे. एकीकडे ईलान मस्क अर्धा ट्रिलियन डॉलरचे मालक होतात आणि दुसरीकडे जगातील बालके उपाशी पोटी झोपतात हे एकाच ग्रहावर एकाच वेळी घडत आहे. हा नैसर्गिक नियतीचा खेळ नाही, हे मानवी निर्णयांचा परिणाम आहे आणि जे मानवी निर्णयांनी घडले ते मानवी निर्णयांनीच बदलता येऊ शकते. खाद्य सुरक्षा, हवामान न्याय, माध्यम स्वातंत्र्य आणि आर्थिक विषमता या चार आव्हानांचा एकमेकांशी घनिष्ट संबंध आहे. एकट्याने त्यांचा सामना करणे शक्य नाही. एकात्मिक, जागतिक आणि धाडसी उत्तर देणे आवश्यक आहे. कारण हा लेख लिहीतांना प्रश्न पडतो की जेव्हा माणसाने चंद्रावर पाऊल ठेवता येते, AI तयार करता येते, अंतराळात उपग्रह सोडता येतात तेव्हा प्रत्येक मुलाला रात्री भरपोट जेवण मिळणे एवढे कठीण का वाटते? उत्तर क्षमतेत नाही, ते इच्छाशक्तीत आहे आणि ती इच्छाशक्ती निर्माण करणे हेच आपल्या पिढीसमोरचे सर्वात मोठे आव्हान आहे. ■■

विकास परसराम मेश्राम
मो.7875592800



स्वाभिमानाचे स्मरणशिल्प -८८

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा न्यू खेडी गाव तितुर रोड नागपूर

नागपूर जवळील गावात बौद्ध बांधव कमी प्रमाणात असले तरी श्रीमंत आहे त्यांनी उत्कृष्ट बुद्ध विहार बांधले असून भव्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा आहे. त्याठिकाणी विविध कार्यक्रमाचे आयोजन होत असतात.

संवाद मित्र, कपिल नारनवरे
मो. 9370773608

# 11 वे आंबेडकरी साहित्य संमेलन थाटात

## आंबेडकरी साहित्य सर्वसमावेशक आहे : डॉ. बी. रंगराव





**अमरावती :** आंबेडकरवाद व आंबेडकरवादी साहित्य हे सर्वसमावेशक आहे हे जितके खरे तितकेच ते अमानुष परंपरा व मानवी प्रतिष्ठेच्या आड येणारी प्रत्येक गोष्ट सर्व शक्तीनिशी विरोध करते हे तितकेच खरे आहे. पहिल्या व दुसऱ्या पिढीतील दलित लेखक ज्यांना आज आंबेडकरवादी लेखक म्हणता येईल. त्यांनी इथल्या अमानुष परंपरेचा विरोध केला. आपल्या साहित्यकृती मधून पारंपारिक निकष नाकारून साहित्याची नवी निकषे निर्माण केली. साहित्याची नवी भाषा निर्माण केली. म्हणून आंबेडकरी साहित्य हे सर्वसमावेशक असून तेच खरे वैश्विक साहित्य असल्याचे प्रतिपादन डॉ. बी. रंगराव यांनी केले. ते वनसंपदा मंगल कार्यालय, आर्वी रोड, रोहणा येथे स्मृतीशेष जयरामजी चव्हाण, स्मृतीशेष गौतम उमरे परिसरात स्मृतीशेष राजकुमार विघ्ने विचार मंचावर समता साहित्य मंच आर्वी-आष्टी-कारंजाचे वतीने अकराव्या आंबेडकरी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षस्थानावरून बोलत होते. या साहित्य संमेलनाचे उद्घाटक म्हणून सुप्रसिद्ध आंबेडकरी विचारवंत प्रा. डॉ. मनोहर नाईक, नागपूर तर प्रमुख अतिथी प्रा. डॉ. वामन गवई, अमरावती तसेच प्रा. डॉ. सिद्धार्थ बुटले, वर्धा हे होते तर स्वागताध्यक्ष डॉ. प्रितम मनवर, आर्वी हे उपस्थित होते. संमेलनाचे उद्घाटक आंबेडकरी विचारवंत प्रा. डॉ. मनोहर नाईक यांनी जगातील अनेक थोर विचारवंतांनी धर्मव्यवस्थेचे अन्यायी शोषक व रक्त पिपासू स्वरूप जगापुढे मांडले. यावेळी विशेष अतिथी म्हणून आंबेडकरी थोर विचारवंत डॉ. वामन गवई व प्रा. डॉ. सिद्धार्थ बुटले यांनी इथल्या समस्त शोषित, पिडित, वंचित बहुजनांना आंबेडकरी साहित्याशिवाय पर्याय नसल्याचे आपल्या भाषणात सांगितले. आंबेडकरी महिलांच्या कष्टावर आंबेडकरी चळवळीचा हा डोलारा उभा असल्याचेही त्यांनी आवर्जून सांगितले. वर्तमान स्थितीत आंबेडकरी चळवळीची भूमिका या विषयावरील परिसंवादात प्रा. डॉ. रविंद्र मुन्द्रे यांनी आपला लेखाजोखा मांडला.

याप्रसंगी माधुरी शेलोकर, प्रसेनजित गायकवाड, यांनी आंबेडकरी चळवळ कधीच संपणार नाही, असे प्रतिपादन केले. त्यानंतर सुशिलदत्त बागडे यांनी मी जोतीराव फुले बोलतोय हा एकपात्री प्रयोग सादर केला तर विलास थोरात यांनी पंधरा ऑगष्ट हा संजय जीवने लिखित नाटकाचा एकपात्री प्रयोग सादर केला. त्यानंतर मान्यवर अतिथींचे स्वागत होऊन संविधान प्रास्ताविकेचे वाचन नंदा पाटील (पांडे) आणि पाहुण्यांचा परिचय मनोहर लांडगे यांनी करून दिला व साहित्य संमेलनाची भूमिका पुरूषोत्तम डोंगरे यांनी मांडली. याप्रसंगी मान्यवरांनी उपस्थितांना यथोचित मार्गदर्शन केले. उद्घाटकीय कार्यक्रमाचे संचालन गणेश लांडगे यांनी तर आभार राहुल शेंडे यांनी मानले. त्यानंतर ज्येष्ठ कवी, वज्रनादकार दिगंबर झाडे यांच्या 'वज्रनाद' या मराठी कविता संग्रहाच्या हिंदी अनुवादित कविता संग्रहाचे तसेच लेखक राजकुमार सोनटक्के यांच्या 'वादळातील निखारे' या वैचारिक लेख संग्रहाचे सोबतच साप्ताहिक वज्जी संदेश या विशेषांकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते झाले. याप्रसंगी प्रल्हादराव सहारे रोहणा, सुभाष दिघाडे रोहणा, अशोकराव काळे विरूळ, सचिन दहाट पिंपरी, साप्ताहिक वज्जी संदेशचे कार्यकारी संपादक धर्मशील गेडाम बडनेरा, गाथा प्रकाशनचे संचालक विलास थोरात, इत्यादी मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. साप्ताहिक वज्जी संदेशच्या मुख्य संपादिका माया वासनिक गेडाम यांच्या अध्यक्षतेखाली कविसंमेलन झाले. या संमेलनात सहभागी ज्येष्ठ आंबेडकरी मान्यवर कवींनी आपापल्या रचना सादर केल्यात, संचालन संजय मोखडे/विलास थोरात यांनी तर आभार प्रदर्शन सुप्रसिद्ध कवी सुरेश भिवगडे यांनी केले. संमेलनाचे समारोपीय सत्र संमेलनाध्यक्ष डॉ. बी. रंगराव, मुंबई, उद्घाटक प्रा. डॉ. मनोहर नाईक, नागपूर, प्रमुख अतिथी प्रा. डॉ. विजया मुळे आर्वी, यांच्या प्रमुख उपस्थित झाले. या कार्यक्रमाचे संचालन संध्या भगत, ठराव वाचन प्रा. डॉ. प्रवीण काळे, तर आभार प्रदर्शन नवीन वासेकर यांनी केले. यावेळी स्मृतीशेष राजकुमार विघ्ने स्मृतीप्रीत्यर्थ अरुण विघ्ने तर्फे समता साहित्य मंचातील मान्यवर कार्यकर्त्यांचा सत्कार केला.

# नोकरी महामेळाव्यात अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांनी सहभागी होण्याचे बार्टीचे आवाहन




**पुणे :** कोल्हापूर विद्यापीठामध्ये दि. 22 फेब्रुवारी 2026 रोजी राज्यस्तरीय नोकरी महामेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यामध्ये अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टीच्यावतीने करण्यात आले आहे. शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर व डॉ. ज्ञानेश्वर मुळे फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 22 फेब्रुवारी सकाळी 11 वाजता या मेळाव्याचे उद्घाटन होणार आहे. या मेळाव्यामध्ये आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय स्तरावरील नामांकित प्लेसमेंट एजन्सी सहभागी होतील. महाराष्ट्रातील युवक युवती तसेच विविध शासकीय शैक्षणिक व औद्योगिक संस्थांना एकत्रित व्यासपीठ उपलब्ध करून या माध्यमातून रोजगाराच्या संधी निर्माण करण्यात येणार आहेत. या मेळाव्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था यांचा एक माहितीपर स्टॉल असणार आहे. यामध्ये बार्टीच्या विविध योजनांची, प्रशिक्षण कार्यक्रमाची माहिती देण्यात येणार आहे. त्याचबरोबर बार्टीच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या ओव्हरसीज म्हणजे परदेशातील नोकरीच्या संधी याबद्दलही माहिती देण्यात येणार आहे. बार्टीकडील विविध प्रशिक्षण घेतलेले व अन्य अनुसूचित जातीच्या युवक, युवती यांनी या महामेळामध्ये मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन बार्टीचे महासंचालक सुनील वारे, निबंधक विशाल लोंढे, विस्तार व सेवा विभागाचे प्रमुख डॉ. बबन जोगदंड व कौशल्य विभागाचे प्रमुख अनिल कारंडे यांनी केले आहे.

## महत्वाचे

### संगीता ठलाल यांचा रुग्णांना फळ वाटप करून वाढदिवस साजरा



**कुरखेडा :** मूळ गाव देऊळगाव येथील व सध्या कुरखेडा येथे वास्तव्यास असणाऱ्या साहित्यिक, सामाजिक कार्यकर्त्या संगीता संतोष ठलाल आपल्या दैनंदिन लिखाणाबरोबरच अनेक सामाजिक उपक्रम राबवले आहेत. दरवर्षी आपल्या वाढदिवसाच्या निमित्ताने गोर गरीब, आदिवासी, दिव्यांग यांची भेट घेऊन व भेटवस्तू देऊन सामाजिक उपक्रम राबवत असतात, तसेच यावर्षी सुद्धा उपजिल्हा रुग्णालय कुरखेडा येथे जाऊन रुग्णांची भेट घेतली, त्यांच्याशी संवाद साधला व त्यांना फळ वाटप करून आपला वाढदिवस साजरा केला. रुग्णांनी सुद्धा त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. त्या शुभ प्रसंगी उपस्थित असलेले वैद्यकीय अधिकारी डॉ. सचिन कवाडकर, डॉ. राऊत, डॉ. प्रिया जुमनाके, कर्मचारी पुष्पलता कवाड, बडोले, सुप्रिया, शिवलता सिस्टर, योगेश व कर्मचारी उपस्थित होते. सोबतच संगीता ठलाल यांनी आपला सर्वपरिचित असलेला 'रानभाज्यांच्या जगात' हा संशोधन ग्रंथ रुग्णालयाला भेट म्हणून दिले. सोबतच डॉ. प्रिया जुमनाके यांनी संगीता ठलाल यांना भेटवस्तू देऊन त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. उपस्थित असलेले सर्व कर्मचारी वृंदानी त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. रुग्णालयातील एवढा स्नेह बघून संगीता ठलाल यांनी रुग्णांचे तसेच कर्मचारी वृंदाचे आभार मानले.

### प्रियदर्शनी चॅरिटेबल ट्रस्टद्वारा कोहळीत चौथी धम्म परिषद




**नागपूर :** प्रियदर्शी चॅरिटेबल ट्रस्ट कोहळीच्यावतीने चौथ्या धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले. भदंत आनंद समता परिसर बाजार चौक कोहळी कळमेश्वर येथील समता सैनिक दलाच्या उपस्थितीत धम्म रॅली काढण्यात आली. त्यानंतर धम्म परिषदेचे उद्घाटन भदंत परमपदा यांच्या शुभहस्ते झाले. धम्म परिषदेत धम्म ध्वजारोहन, बुद्धवंदना, परित्रण पाठ, धम्मदेशना, नाट्य, परिसंवाद, भोजनदान, सत्कार, प्रबोधन आणि बुद्ध भीमगीते तसेच आंबेडकरवादी दृष्टिकोनातून बुद्ध धम्म त्यागमूर्ती माता रमाई यांचा जीवन संघर्ष व दीक्षाभूमीवरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या धम्मदीक्षेला 69 वर्ष पुर्णपणे होत असून धर्मांतराची 69 वर्ष आणि समाज वास्तव्य या विषयावर चर्चासत्र घेण्यात आले. काटोलचे भीमेश भारती यांनी बुद्ध भीमगीते सादर केले. धम्म परिषदेचे कार्यक्रम 6 ते 8 फेब्रुवारीच्या दरम्यान संपन्न झाले. या धम्म परिषदेच्या कार्यक्रमाची शोभा वाढवली. धम्म परिषदेला प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष तनमनाने सहकार्य करून मोठ्या संख्येने उपासक - उपासिका या कार्यक्रमाला हजर होत्या. धम्म परिषदेत उपस्थितीत वासुदेवराव उके, संगमित्रा ढोके, अमर चवरे, प्रा. प्रवीण कांबळे आणि ॲड. स्मिता ताकसंडे यांची उपस्थिती होती.

## आजचे कार्यक्रम

**व्याख्यान**

**दिनांक :** दि. 20 फेब्रुवारी 2026
**वेळ :** सायंकाळ 5.30 वाजता.
**विषय :** 'सायबर गुन्हेगारी व आपली सुरक्षितता'
**मार्गदर्शन :** लोहित मतानी IPS उपायुक्त, नागपूर, पोलीस आयुक्तालय, नागपूर.
**स्थान :** महात्मा फुले उद्यान, श्रीनगर, सुयोगनगर मित्र मंडळ, नागपूर.

# 21 वा धम्मगिरी बौद्ध महोत्सव धम्मगिरी टेकडीवर साजरा

**नागपूर :** धम्मगिरी टेकडी, चारगाव, बडेगाव, खेकडा नाला मार्ग सावनेर येथे सांची स्तूप गेटचे उद्घाघाटन करण्यात आले होते. दरवर्षी वृक्षारोपण, शैक्षणिक, धार्मिक, सामाजिक कार्यक्रम करण्यात येते.

21 वा धम्मगिरी बौद्ध महोत्सवाचे आयोजन केले. भदन्त आर्य नागार्जुन सुरई ससाई, भिक्षुगण यांच्या उपस्थितीमध्ये प्रज्ञाशील बुद्ध विहार बडेगाव येथून धम्म रॅली काढली. धम्म रॅली ही हेटी बडेगाव चौक येथील तथागत बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे प्रतिमेला माल्यार्पण केले. रॅली चारगाव येथील धम्मगिरी बुद्ध विहारात बुद्ध वंदना केली. धम्म रॅली ही धम्मगिरी टेकडीवर पोहचली. टेकडीवर बुद्ध मूर्तीला भिक्षु संघानी वंदना केली. भदन्त आर्य नागार्जुन सुरई ससाई यांच्या अध्यक्षतेखाली महोत्सव सुरू करण्यात आला. भदन्त नागसेन, प्रज्ञाबोधी, धम्मविजय, महानाग, धम्मप्रकाश, बोधीधम्म किर्ती, भिक्खु संघप्रकाश थोरले, श्रामणेर संघ यांनी प्रवचन दिले. कार्यक्रमाचे संचालन अधिर बागडे यांनी केले. कार्यक्रमाचे संयोजक रिता बागडे यांचा सत्कार करण्यात आला. आभार प्रदर्शन निर्भय बागडे यांनी केले. लघु नाटिका 'जनजागृती संविधान की' याची प्रस्तुती दि बुद्धीस्ट गोल्डन इरा वुमेन्स फाऊंडेशन तर्फे करण्यात आली.



कार्यक्रमाला उपासक उपासिका उपस्थित होते. भोजन दान अजिंक्य बागडेद्वारा देण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन ग्लोबल वेलफेअर असोसिएशन आणि धम्म गिरी विकास समिती, बुद्ध टुर्स अँड ट्रॅव्हल्स तर्फे करण्यात आले. या कार्यक्रमाला हरीपाल बागडे, हरिभाऊ सोमकुवर, विवेक बागडे, सिद्धार्थ शेंडे, दिनेश गजभिये, सुजाता रंगारी, पंकज बागडे, भुषण जनबंधु, विभा टेंभेकर, लूंबीनी शेंडे, सीमा बंसोड, लक्ष्मी यादव, खंडारे यांनी अथक परिश्रम करून कार्यक्रम यशस्वी केला.

# जगातील सर्वोत्तम दहा युद्धांपैकी एक युद्ध म्हणजे छ. शिवाजी महाराजांनी केलेले प्रतापगडचे युद्ध : सुशील मणचेकर

**देवगड :** शिक्षण विकास मंडळ, देवगड संचलित स. ह. केळकर महाविद्यालय आणि म. न. शां. पंतवालावलकर कनिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने कौन्सिल सभागृहात आज सकाळी 9.00 वाजता शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात छ. शिवाजी महाराजांच्या प्रतिमापूजनाने प्रमुख पाहुणे सुशील मणचेकर यांनी केली आणि महाराजांना अभिवादन केले. या प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. श्रीकांत सिरसाठे यांनी प्रास्ताविकामध्ये शिवरायांच्या कार्याची महती सांगून शिवरायांचे शेतकऱ्याविषयीचे धोरण अशा त्यांच्या विविध कार्यकर्तृत्वाचा गौरव करून सभागृहात शिवमय व चैतन्यपूर्ण वातावरण निर्माण केले. त्यानंतर न. शां. पंतवालावलकर कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. पारस जाधव यांनी शिवरायांमध्ये राजमाता जिजाऊ यांनी ज्या चार नैतिक मूल्यांची रुजवण केली. त्या



न्याय, स्वातंत्र, समता आणि बंधुत्व यांची आजही भारतीय समाजाला आहे हे अधोरेखित केले. त्यानंतर प्रमुख वक्ते म्हणून सुशील मणचेकर यांनी रयतेचा राजा छ. शिवाजी महाराज या विषयावर मौलिक असे मार्गदर्शन केले. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन, कार्य, नेतृत्व आणि स्वराज्याच्या संकल्पनेवर प्रकाश टाकला. शिवरायांच्या दूरदृष्टी, न्यायप्रियता आणि रयतेच्या राजा म्हणून असलेल्या भूमिकेचे महत्त्व अधोरेखित करत प्रबोधन केले. जगातील सर्व लष्करांमध्ये जगातील सर्वोत्तम म्हणल्या जाणाऱ्या दहा युद्धांचा अभ्यास शिकवला जातो. त्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी प्रतापगडावर केलेल्या युद्धाचा समावेश आहे. त्यांनी वापरलेल्या युद्धनीतीचा जग अभ्यास करत आहे. मावळ्यांची फौज तयार करून संघटित होऊ शकतो व तोरणा जिंकल्यावर जिंकू शकतो आणि त्यातूनच स्वराज्य निर्माण करू शकतो हा आत्मविश्वास छ. शिवाजी महाराजांनी रयतेमध्ये निर्माण केला. त्यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्हि.बी. कुनुरे यांनी अध्यक्षीय समारोप करताना छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विषयी गौरवोद्गार व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. प्रल्हाद कांबळे यांनी केले. तर प्रा. सचिन दहीबावकर यांनी उपस्थितांचे आभार मानले. शिवजयंतीच्या निमित्ताने उपस्थित सर्वांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस अभिवादन केले. सदर कार्यक्रमासाठी महाविद्यायातील प्राध्यापक वर्ग, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला.

# ग्राम विकास विद्यालयात वर्ग दहावीच्या विद्यार्थ्यांचा भावस्पर्शी निरोप समारंभ



**रिधोरा :** ग्राम विकास विद्यालय रिधोरा ता. काटोल येथे वर्ग दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ आयोजित केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षतेस्थानी शाळेचे मुख्यद्यापक नितीन बोलके हे होते तर प्रमुख अतिथी शाळेच्या संचालिका डॉ. प्रा. वैशाली टालाटुले उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन व स्वागत गीताने करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थी व शिक्षकांनी आपली मनोगते व्यक्त करुन शाळेच्या अनेक आठवणींनी उजाळा दिला. कार्यक्रमाच्या मुख्य अतिथी डॉ. प्रा. वैशाली टालाटुले यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना या पुढील शैक्षणिक टप्पा खूप महत्वाचा आहे. डॉ. प्रा. वैशाली यांनी व्यक्त केला. यावेळी शाळेचे शिक्षक प्रफुल्ल गोलाईत यांनी कुसुमाग्रजांची 'कणा' ही कविता गाऊन विद्यार्थी व शिक्षकांचे नात्यावर प्रकाश टाकला. शाळेचे क्रीडा शिक्षक विजय मोहोड, प्रवीण साबळे व आगरकर यांनी सुद्धा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनीसुद्धा आपली मनोगते व्यक्त करतांना शाळेबद्दल असलेले प्रेम, शिक्षकांबद्दलचा आदर, शाळेतील गोड आठवणीं, वर्गातील घडामोडीचा, शाळेतील विविध स्पर्धा व खेळा बाबतच्या भावना व्यक्त केल्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बल्की भक्ते, तिडके, गमे, धनराज उमाळे देविदास सुरजुसे यांचे विशेष सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे संचालन पलक पुरी व उपस्थितांचे आभार निशांत डिवरे यांने मानले.

# गडपिपरी येथे रमाई जयंतीदिनी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सत्कार



**गडपिपरी :** गंधकुट्टी बुद्धविहार व पंचशील महिला मंडळ, गडपिपरी (पो. आंबोली) यांच्या संयुक्त विद्यमाने त्यागमूर्ती रमाबाई आंबेडकर यांची 128 वी जयंती तसेच सेवानिवृत्त व सेवाकार्यरत कर्मचाऱ्यांचा सत्कार सोहळा झाला. कार्यक्रमाची सुरुवात गौतम बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, जोतिबा फुले, तुकडोजी महाराज, शाहू महाराज, छत्रपती शिवाजी महाराज, सावित्रीबाई फुले व माता रमाई यांच्या प्रतिमांना हार व पुष्प अर्पण करून करण्यात आली. स्वागत गीतांनी वातावरण भक्तीमय झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. मनोहर टेंभुकर (तलोधी) होते. प्रमुख पाहुणे म्हणून सज्जन शेंडे, मंगेश भोयरगाडे, गोपाळ खोब्रागडे, राजू कापसे आदी मान्यवर उपस्थित होते. कांबळे यांनी रमाईचा जन्मापासून अखेरपर्यंतचा प्रेरणादायी जीवनप्रवास उलगडून सांगितला. बामसेफचे कार्यकर्ते निळकंठ बहादूरे यांनीही समायोचित मार्गदर्शन केले. या प्रसंगी सेवानिवृत्त वरिष्ठ शाखा प्रबंधक भगवान निमगडे यांच्यासह मुख्याध्यापक, शिक्षक व विविध विभागातील कर्मचारी यांचा सत्कार केला. सेवाकार्यरत कर्मचाऱ्यांचाही गौरव केला. प्रस्ताविक चंद्रभान गजभिये यांनी केले. संचालन भगवान निमगडे व समीर पाटील यांनी केले, तर आभारप्रदर्शन चंद्रभान पाटील यांनी केले. सरपंच चंदुलाल पाटील यांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बौद्ध पंचकमिटीचे अध्यक्ष अमोल पाटील, सचिव प्रकाश पाटील, पंचशील महिला मंडळाच्या अध्यक्षा पंचशीला गोगले, सचिव चंदा रामटेके तसेच सर्व उपासक-उपासिकांनी परिश्रम घेतले. प्रमुख पाहुणे सज्जन शेंडे (आरटीओ

# हैप्पी माईंड स्कूलमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन साजरे




**नागपूर :** हॅप्पी माइंड्स प्रिस्कूल ओमकारनगर, नागपूरमध्ये नुकताच वार्षिक स्नेहसंमेलन साजरा केला. कार्यक्रमास पालक, मान्यवर व शिक्षकवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमामध्ये लहानग्या विद्यार्थ्यांनी आपल्या निरागस व आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणांनी सर्वांची मने जिंकली. छोट्या छोट्या मुलांनी आकर्षक वेशभूषेत विविध विषयांवर आधारित सुंदर नृत्याविष्कार सादर केले. त्यांच्या निरागस हास्याने व तालबद्ध सादरीकरणाने उपस्थित प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले. कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला अभिवादन करून दीप प्रज्वलन प्रमुख अतिथी प्राचार्य डॉ. अजय चिकाटे व चिकाटे, शाळेचे डायरेक्टर श्रीकांत बुलकुंड व प्रिंसिपल अस्मिता बुलकुंडे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर, सामाजिक संदेश देणारे, सेमी क्लासिकल व ब्लॅक आणि वाईट जमान्यातील रेट्रो सॉंग ईत्यादीवर सुरेख सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून आपल्या कलागुणांची झलक दाखवली. या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला प्रोत्साहन देण्याचा शाळेचा उद्देश स्पष्टपणे दिसून आला. मराठी भाषेवर प्रभुत्व असलेल्या प्रा. चिकाटे यांनी मुलांना आवडेल अशी सुंदर कविता सादर केली व निरागस मुलांचे बालपण जपण्यासाठी मार्गदर्शन केले. शाळेच्या प्रिंसिपल अस्मिता बुलकुंडे यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले. 'हसत-खेळत शिकूया, आत्मविश्वासाने वाढूया' हा संदेश देत त्यांनी विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. संचालन कल्पना आर. यांनी व आभार प्रदर्शन प्रिती भोसले यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पृथ्वी बोरकर व नर्सरी टिचर ट्रेनिंगच्या निवेदिता नावले, सोनाली महतो, नाजनीन, प्रणाली बनसोड, लिना घोषाल, अंकिता साकोरे व अंशु चौधरी ईत्यादींनी परिश्रम घेतले.

## निधन वार्ता

### शिलाबाई भाष्करराव अढाऊ



**वर्धा :** प्रसिद्ध लेखक आणि कवी अरुण विघ्ने यांची धाकटी बहिण शिलाबाई भाष्करराव अढाऊ, मु. पिंपळगाव (वडाळा) पो.सोरटा, त.आर्वी, जि.वर्धा हिचे अल्पशा आजाराने दि.18/2/2026 रोज बुधवारला रात्री 11.50 वाजता मेघे हॉस्पीटल, सावंगी (मेघे) येथे निधन झाले. अंत्यविधी दि.19/2/2026 ला दुपारी 12.30 वाजता पिंपळगाव (वडाळा) येथे पार पडला.

# व्हिएतनाम येथे सहावे आंबेडकरवादी विश्व साहित्य संमेलन

## संमेलनाध्यक्षपदी डॉ. सुनील रामटेके तर उद्घाटक डॉ. ली व्हॅन चॅन

**नागपूर :** जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळातर्फे सहावे आंबेडकरवादी विश्व साहित्य संमेलन व्हिएतनामची राजधानी हनोई येथे दि. 21 व 22 मार्च 2026 रोजी आयोजित करण्यात आले आहे. या विश्व साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी सुप्रसिद्ध नाटककार, कवी व समीक्षक डॉ. सुनील रामटेके यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. रविवार दि. 15 फेब्रुवारी 2026 रोजी महामंडळाच्या कार्यालयात झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या संमेलनाचे स्वागताध्यक्ष म्हणून शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील माजी समाजशास्त्र विभागप्रमुख व आंतरराष्ट्रीय कीर्तीचे समाजशास्त्रज्ञ डॉ. जगन कराडे कार्यभार सांभाळणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष डॉ. दीपककुमार खोब्रागडे राहतील. मे 2025 मध्ये श्रीलंकेची राजधानी कोलंबो येथे पाचवे आंबेडकरवादी विश्व साहित्य संमेलन सुप्रसिद्ध लेखक डॉ. विद्याधर बन्सोड यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले होते. त्या वेळी डॉ. विद्याधर बन्सोड यांच्याकडून अध्यक्षपदाची सूत्रे आता डॉ. सुनील रामटेके स्वीकारणार आहेत.

जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळाने यापूर्वी थायलंड, मलेशिया, पुन्हा थायलंड, दुबई आणि श्रीलंका येथे आंबेडकरवादी विश्व साहित्य





संमेलनांचे यशस्वी आयोजन केले आहे. भारतात चिमूर, खानगाव, सोनेगाव/अड्याळ येथे अखिल भारतीय आंबेडकरवादी साहित्य संमेलने घेण्यात आली आहेत. तसेच पहिले आंतरराष्ट्रीय बौद्ध साहित्य संमेलन कोलंबो येथे पार पडले होते. यापूर्वी या संमेलनाचे अध्यक्षपद डॉ. रावसाहेब कसबे, डॉ. श्रीपाल सबनीस, डॉ. विद्याधर बन्सोड व डॉ. दीपककुमार खोब्रागडे यांनी भूषवले आहे. जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळ ही जगात आंबेडकरवादी विश्व साहित्य संमेलने घेणारी एकमेव संस्था असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा जागतिक स्तरावर प्रचार व प्रसार करण्यासाठी ही संस्था कार्यरत आहे.

यावर्षी डॉ. सुनील रामटेके यांच्या अध्यक्षतेखाली

**या विश्व साहित्य संमेलनाचे उद्घाटन हनोई येथील आंतरराष्ट्रीय विद्यापीठातील भाषाशास्त्र विभागाचे प्रमुख व सुप्रसिद्ध विचारवंत डॉ. ली व्हॅन चॅन यांच्या हस्ते होणार आहे. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. थॉन थूऑग, डॉ. ट्रॅन थी थॅन वॅन, डॉ. होआॅग मिन्ह सन, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे सदस्य डॉ. राजेश गायकवाड, तामिळनाडूचे सुप्रसिद्ध लेखक डॉ. गुरूस्वामी, दिल्ली येथील सुप्रसिद्ध विचारवंत डॉ. के. पी. वासनिक, मिलिंद कॉलेज, संभाजीनगर येथील प्राचार्या डॉ. वैशाली प्रधान तसेच गुजरातमधील सुप्रसिद्ध विचारवंत एम.एच. मकवाना उपस्थित राहणार आहेत.**

होणाऱ्या या संमेलनात सुमारे 500 प्रतिनिधी सहभागी होणार असून दोन दिवस चालणाऱ्या या संमेलनात आंबेडकरवादी साहित्यावर विविध परिसंवाद, कवी संमेलन, कथाकथन, नाटकांचे सादरीकरण तसेच विविध ग्रंथांचे प्रकाशन होणार आहे. सहाव्या आंबेडकरवादी विश्व साहित्य संमेलनाचे संमेलनाध्यक्ष डॉ. सुनील रामटेके यांच्या साहित्यप्रवासाची सुरुवात कवितेपासून झाली. 1989 मध्ये त्यांचा 'चवदार तळे' हा पहिला कवितासंग्रह प्रकाशित झाला. 'महासूर्य' हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित महानाट्य त्यांनी लिहिले असून या नाटकाचे महाराष्ट्रात आतापर्यंत सुमारे साठ प्रयोग झाले आहेत. प्रख्यात अभिनेते डॉ. श्रीराम लागू यांनी या नाटकाला आपला आवाज दिला आहे. 'महासूर्य' या नाटकाला 25 वर्षे पूर्ण झाली आहेत. सयामी जुळ्या मुलींवरील 'समांशी' हे त्यांचे नाटक विशेष गाजले असून जागतिक रंगभूमीवर प्रथमच असा विषय त्यांनी हाताळला. 'सृजनसंदर्भ', 'पाश्चात्य साहित्य विचाराचा प्रभाव', 'आधुनिक मराठी कविता - आस्वाद आणि चिकित्सा', 'लढाऊ स्त्रीची कविता', 'दलित साहित्य चर्चा' हे त्यांचे समीक्षाग्रंथ प्रसिद्ध आहेत. 'मराठी व्याकरणातील वादस्थळे' हा त्यांचा महत्त्वपूर्ण संशोधनग्रंथ असून 'भोलाराम इंडियन' हे हिंदी मुक्तनाट्य त्यांनी लिहिले आहे. 'विद्रोही' आणि 'रूधरा' या त्यांच्या एकांकिका लोकप्रिय ठरल्या आहेत. डॉ. सुनील रामटेके हे एस.एन.डी.टी महिला विद्यापीठ येथे मराठी भाषा विभागप्रमुख म्हणून कार्यरत आहेत. ते विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष, अकॅडेमिक कौन्सिलवर राज्यपालांचे प्रतिनिधी, मुंबई विद्यापीठातील संशोधन सल्लागार समितीवरील तज्ज्ञ प्रतिनिधी तसेच अनेक विद्यापीठांच्या अभ्यास मंडळांवर तज्ज्ञ सदस्य म्हणून कार्यरत आहेत. आंबेडकरवादी नाट्यचळवळीचा पाया रचण्यात त्यांचा महत्त्वाचा वाटा आहे. पथनाट्य चळवळीतही त्यांनी 'बालिका' व 'मंडल' ही दोन गाजलेली पथनाट्ये लिहिली आहेत. सांस्कृतिक व नाट्य क्षेत्रातील कार्यासाठी त्यांना 'स्मिता पाटील पुरस्कार', 'दीपरंग नाट्य पुरस्कार', 'आचार्य अश्वघोष पुरस्कार', 'प्रबुद्ध नाट्य पुरस्कार' आणि 'महात्मा फुले आंतरराष्ट्रीय पुरस्कार' प्रदान करण्यात आले आहेत. व्याकरण अभ्यासासाठी त्यांना साहित्य अकादमी, दिल्ली येथील फेलोशिपही प्राप्त झाली आहे. साहित्य व कला क्षेत्रातील बहुमोल योगदानामुळेच डॉ. सुनील रामटेके यांची व्हिएतनाम येथे होणाऱ्या सहाव्या आंबेडकरवादी विश्व साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीबद्दल जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष डॉ. दीपककुमार खोब्रागडे, सरचिटणीस कुलगुरू डॉ. प्रकाश करमाडकर, प्राचार्य डॉ. विलास तायडे, डॉ. अनिल काळबांडे, अनिल मनोहर, राजेश्री धवन, डॉ. रेहानाआरा बेग, डॉ. तृप्ती सोनवणे, किरण आंबेकर, प्रा. काजल गायकवाड, डॉ. कल्याण श्रावस्ती, मल्लेश चौगुले, प्राचार्य डॉ. नागनाथ पाटील, डॉ. एन. सिंह, डॉ. गोविंद काजरेकर, मधुकर वानखेडे, डॉ. राजेंद्र गोणारकर, प्रा. वैशाली देठे, डॉ. अनिल सूर्या, डॉ. प्रदीप इंगोले, मंगेश पवार, तुकाराम फुलझेले, डॉ. बालाजी मुंडे यांनी अभिनंदन केले आहे.

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648